# मा. अति. सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, कंधार जि. नांदेड

**सत्र खटला क्रमांक ९१/२०१३**
**सरकार वि. परविनसिंह व इतर**
**निशाणी – १९५**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १० यांची जबानी –**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | : | **विश्वजीत भगवानराव घोडके,** |
| **वय** | : | ४५ वर्षे |
| **व्यवसाय** | : | नोकरी (पोलीस निरीक्षक) |
| **पत्ता** | : | सातारा, ता.जि.सातारा |

**सरकारतर्फे सरतपासणी श्री.एम.बी.कागणे, सरकारी वकील यांच्यातर्फे :–**

१. मी सध्या सातारा येथे पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयातील नियंत्रण कक्षामध्ये पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.

२. मी सन २०१२ मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून पोलीस स्टेशन लोहा येथे कार्यरत होतो. दिनांक २९.११.२०१२ रोजी पोलीस स्टेशन उस्माननगर येथील कार्यभार तात्पुरता माझ्याकडे देण्यात आला होता. सदर दिवशी उस्माननगर पोलीस स्टेशन अकस्मात मृत्यू क्र.२०/२०१२ चा तपास माझ्याकडे देण्यात आला होता.

३. सदर तपासामध्ये आम्ही दोन पंचासमक्ष घटनास्थळी जाऊन घटनास्थळ पंचनामा केला. सदर घटनास्थळ पंचनाम्या दरम्यान एक नॉयलॉन दोरी जप्त करण्यात आली. सदरचा पंचनामा मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी आणि पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१९६**

देण्यात येते. सदर घटनास्थळावर एक चिठ्ठी मिळून आली होती. सदरची चिठ्ठी जप्त करून जप्ती पंचनामा दोन पंचासमक्ष करण्यात आला. तो जप्ती पंचनामा मी आता पाहिला. त्यावर माझी आणि पंचाची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१९७** देण्यात येते. सदर तपासामध्ये घर झडती पंचनामा करण्यात आला. त्यादरम्यान वाघाचे चित्र असलेली एक वही दोन पंचासमक्ष जप्त करण्यात आली. सदरचा जप्ती पंचनामा मी आता पाहिला. त्यावर माझी आणि पंचाची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१९८** देण्यात येते. मला आता वाघाचे चित्र असलेली एक वही दाखविण्यात आली. ती वही तीच आहे. तिला **वस्तू क्र.१(MO-1)** देण्यात येते. तसेच जप्त करण्यात आलेली चिठ्ठी मला आता दाखविण्यात आली. तिला **वस्तू क्र.२(MO-२)** देण्यात येते.

४. सदर तपासा दरम्यान दोन पंचासमक्ष या गुन्हयातील मयत मोना हिचा मरणोत्तर पंचनामा करण्यात आला. सदरचा पंचनामा पंचनामा मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी आणि पंचाची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.११८** देण्यात आलेली आहे.

५. उस्मानगर पोलीस ठाण्याचा तात्पुरता कार्यभार संपल्यानंतर सदर गुन्हयाचा तपास पुढे मी केला नाही.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास– विधीज्ञ श्री. एन.डी.कोळनूरकर –</u>**

६. आकस्मीक गुन्हयामध्ये तपास नव्हे तर चौकशी असते, हे म्हणणे खरे नाही. (गुन्हयाचा तपास कोणत्या कलमाखाली केला – हा प्रश्न कोर्टाने अभिलेखावर घेतला नाही.) आकस्मीक गुन्हयामध्ये तपास असल्याचे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही.

७. जप्ती पंचनामा, घटनास्थळ पंचनामा व मरणोत्तर पंचनामा हे एकाच दिवशी केले आहेत.

**प्रश्न :** मुलीचे वडील सुरजीतसिंह ठाकूर यांनी त्यांच्या मुलीच्या मृत्यूबद्दल तुमच्याकडे काही सांगितले होते का ?

**उत्तर :** मयत मुलीचे वडील यांनी मला सांगितले की, आम्ही व कुटूंबीय दु:खात आहोत. अंत्यविधीची सर्व प्रक्रीया झाल्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात येऊन तक्रार देऊ, असे सांगितले होते.

८.    वरील प्रमाणे सांगितल्याचे तपास टिपण मी ठेवले नाही. मी चिठ्ठी वाचून पाहिली. सदरची चिठ्ठी वाचल्यानंतर मयत मोनाने आत्महत्या केल्याचे लक्षात आले. जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचे चिठ्ठी वाचून माझे मत झाले. ''जाचाला कंटाळून आत्महत्या करीत आहे'', असे त्यात नमूद नाही. मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**'श्रवणोत्तर स्वीकृत'**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALAJI UMAJIRAO CHOUDHARI
Date: 2026.03.05 16:36:38 +0530

( **बी. यु. चौधरी** )

दिनांक: ०५.०३.२०२६    अति. सत्र न्यायाधीश–१, कंधार